अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर


सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि.१७ जानेवारी २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ११२ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## वेळापूर येथे अज्ञात तरुण महिलेचा खून; परिसरात खळबळ

✔ सुराज्य/वेळापूर

मकर संक्रात सणाची लगबग सुरू असतानाच माळशिरस तालुक्यातील वेळापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पुणे-पंढरपूर पालखी मार्गालगत उघडेवाडी रोडवर मदन माने-देशमुख यांच्या उसाच्या शेतात अंदाजे २५ ते ३० वयाच्या अज्ञात तरुणीचा मृतदेह नग्नावस्थेत आढळून आल्याने वेळापूर परिसरात एकच खळबळ उडाली आहे.




या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी वेळापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नीलेश बागाव यांच्यासह पोलीस कर्मचारी यांनी पाहणी करून घटनेची माहिती वरिष्ठांना कळवली. अकलूज उपविभागीय अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे यांनी घटनास्थळास तातडीने भेट दिली आणि तपास कामी सूचना केल्या. मृत तरुणीच्या तोंडावर दगड मारून चेहरा छिन्नविछिन्न करण्यात आला असल्याने ओळख पटू शकली नाही. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. या घटनेची फिर्याद पोलीस पाटील सतीशराव माने-देशमुख यांनी पोलिसात दिली आहे. या घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नीलेश बागाव हे करीत आहेत.

# आधी दारू पाजली; नंतर डोक्यात फरशी घातली, मित्रानेच मित्राची मध्यरात्री जीवनयात्रा संपवली

✔ सुराज्य/सोलापूर

**दोघेही लंगोटी यार. एकटा ड्रायव्हर तर दुसरा कामगार. ड्रायव्हर गाडी घेऊन गेला की पंधरा-पंधरा दिवस घरी न येणारा. जेव्हा यायचा तेव्हा दोघांचाही पिण्याचा कार्यक्रम व्हायचा. असाच कार्यक्रम घटनेच्या रात्रीही झाला. कामगार मित्राने आणलेली दारू मध्यरात्रीनंतर उशिरापर्यंत ड्रायव्हर मित्राला पाजली. जेव्हा तो फुल्ल झाला; तेव्हा कामगार मित्राने ड्रायव्हर मित्राच्या डोक्यात फरशी घालून त्याची जीवनयात्रा जागेवरच संपवली. पण दारूची बाटली व ग्लास पोलिसांच्या नजरेला पडले आणि अवघ्या बारा तासात कामगार मित्राच्या हातात पोलिसांची बेडी पडली.**

## • बारा तासातच हातात बेडी पडली





बबलू हुंडेकरी

हा प्रकार घडला आहे पूर्वभागातील चिप्पा मार्केटमध्ये. शनिवारी मध्यरात्री घडलेला हा प्रकार रविवारी सकाळी उघडकीस आला. बबलू हुंडेकरी (वय-३५, रा.पद्मानगर) असे मृत ड्रायव्हरचे नाव असून, त्याचा खून केल्याप्रकरणी बसवराज रवींद्र अतनुरे (वय-२५,रा. पद्मानगर, अक्कलकोट रोड सोलापूर) यास जेलरोड पोलिसांनी अटक केली असून न्यायालयाने त्याला दि.१८ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

शहरातील अशोक चौकात असलेल्या चिप्पा मार्केट येथे अनोळखी युवकाचा शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास डोक्यात फरशी घालून खून केला होता. खून एवढा भयानक होता की सुरुवातीला खून झालेल्या युवकाची ओळख पटवणे अवघड झाले होते. तसेच मारेकऱ्याचा शोध घेणेही अवघड होते,परंतु शहर गुन्हे शाखेला अवघ्या बारा तासात आरोपीला पकडण्यात यश आले आहे. ही कामगिरी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांच्या पथकातील सहा.पोलीस निरीक्षक संजय क्षीरसागर, महेश शिंदे, राजू मुदगल, कुमार शेळके, कृष्णात कोळी, निलोफर तांबोळी यांनी केली आहे.

**कारण गुलदस्त्यात :** मृत बबलू आणि मारेकरी बसवराज हे पद्मानगर येथील एकाच गल्लीत राहण्यास असून ते बालमित्र आहेत. घटनेच्या दिवशी रात्री नऊ वाजल्यापासूनच ते दोघे दारू पीत होते. रात्री उशिरा पुन्हा चिप्पा मार्केट येथे दारू पिण्यासाठी गेले. त्याठिकाणी बसवराज याने बबलू याच्या डोक्यात दोन वेळा फरशी घातली. बबलू रक्ताच्या थारोळ्यात पडल्यानंतर बसवराज निघून गेला. मात्र त्याचा मोबाईल तिथेच पडला होता. तो मोबाईल घेण्यासाठी परत गेल्यानंतर पुन्हा त्याने तीच फरशी उचलून बबलूच्या डोक्यात घातली. मात्र यामागचे कारण अद्यापही गुलदस्त्यात आहे.

### दारू बाटलीच्या तुकड्यांनी दाखवली दिशा


गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे व सहा.पोलीस निरीक्षक सुनील क्षीरसागर यांच्या पथकाने घटनास्थळाची कसून पाहणी केली असता घटनास्थळी प्लॅस्टिकचे दोन रिकामे ग्लास तसेच इम्पेरीयल ब्ल्यू(आयबी) या दारूच्या बाटलीचे फुटलेले तुकडे दिसून आले. म्हणजे मृत व आरोपींनी घटेनपूर्वी दारू पिल्याचा अंदाज पोलिसांना आला. त्यावरून परिसरातील सीसीटीव्हीची तपासणी केली असता मृत व आरोपी हातात दारूची बाटली घेऊन निघाल्याचे निदर्शनास आले. त्यावरून तपासाला दिशा मिळाली.

### ११० सीसीटीव्हींची तपासणी

त्यानंतर आणखी काही सी.सी.टी.ही फुटेजची पाहणी केली असता, मृतासोबत असणाऱ्या मित्राने एका घरातून दारूची बाटली व ग्लास घेतल्याचे दिसले.त्यानंतर त्या घरात चौकशी केली असता मृत व त्याचा एक मित्र रात्री दारू घेऊन गेल्याचे त्या घरातील सदस्यांनी सांगितले. त्यावरून मयताची व मारेकऱ्याची ओळख पटली. त्यानंतर पोलिसांच्या तपासाला गती आली.खून करून आरोपी कोणत्या दिशेला गेला असावा याचा अंदाज घेऊन गुन्हे शाखेच्या पोलिसांनी साडेतीन किलोमीटरच्या अंतरातील तब्बल ११० सीसीटीव्ही तपासले.

### मारेकऱ्याने फेकलेल्या कागदाला फुटली वाचा

एका सीसीटीव्ही फुटेजमध्ये मारेकरी हा एकेठिकाणी एक कागद फेकून देताना दिसला. पोलिसांनी त्याठिकाणी जाऊन तो कागद शोधून काढला. तो कागद म्हणजे कपडे शिवण्यासाठी टाकल्यानंतर टेलरने दिलेली पावती होती. ती पावती घेऊन पोलिसांनी तो टेलर शोधून काढला. त्याच्याकडे चौकशी केली असता मृत आणि मारेकऱ्याने त्याच्याकडे कपडे शिवण्यासाठी दिल्याचे उघड झाले. टेलरकडे त्या दोघांची नावे आणि पत्ता होता. त्यावरून मृताची ओळख आणि मारेकऱ्याचा माग काढण्यात पोलिसांना यश आले.



| सोमवारी रात्री झालेल्या नयनरम्य शोभेच्या दारुकामाने सिध्देश्वर यात्रेची सांगता झाली.

## विवाहित इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : शेतातील पत्रा शेडमध्ये एका ४० वर्षीय इसमाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना नंदुर (ता.उत्तर सोलापूर) येथे सोमवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली.

सुनील सुरेंद्र गायकवाड (वय ४० रा. उद्धवनगर सैफुल, सोलापूर) असे मयताचे नाव आहे. आज दुपारी १२ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह स्वतः च्या शेतात असलेल्या पत्रा शेडमधील छताच्या लाकडी वाशाला नायलॉन दोरीने दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. फौजदार लोकरे पुढील तपास करीत आहेत.

# निवृत्तीनाथांच्या चरणी नऊ तोळ्यांचे दागिने अर्पण

### ह.भ.प. बंडातात्या कराडकर यांचे औदार्य

✔ **पंढरपूर** : पंढरीच्या श्री विठ्ठल चरणी भक्तिभावाने आपण माथा टेकवत असतोच पण दानधर्म म्हणून या लोकदेवतेच्या पदरात फूल ना फुलाची पाकळी म्हणून दानही टाकत असतो मात्र,संतांच्या पायी दागिने अर्पण करण्याचा एक अभिनव संकल्प वारकरी संप्रदायातील एका ज्येष्ठ कीर्तनकारांनी केला आहे. वैष्णवजनांना त्याचे विशेष अप्रूप वाटत आहे.



केवळ पंढरपूरच नव्हे तर साऱ्या महाराष्ट्राला परिचित असलेले ज्येष्ठ कीर्तनकार बंडातात्या कराडकर यांच्यावर पुणे येथील खासगी रुग्णालयात सध्या उपचार सुरू असताना त्यांनी एक संकल्प पूर्ण केला. त्र्यंबकेश्वर येथील निवृत्तीनाथांच्या चरणी सुमारे पाच लाख रुपये किमतीचे आठ तोळ्याचे सोन्याचे दागिने अर्पण केले आहेत. नातेपुते येथील त्यांचे भक्त सुनील राऊत यांच्या हस्ते पंढरपूर येथील बापूसाहेब महाराज देहूकर यांच्याकडे ही दागिन्याची भेट मकरसंक्रांतीच्या दिवशी निवृत्तीनाथांच्या चरणी अर्पण करण्यासाठी दिली. बापूसाहेब महाराज देहूकर हे दागिने निवृत्तीनाथ महाराज संस्थानकडे देण्यासाठी त्र्यंबकेश्वरकडे रवाना झाले आहेत. कराडकर हे गेल्या अनेक वर्षापासून कीर्तन, प्रवचन आणि भजनाच्या माध्यमातून निःस्पृहपणे समाज सुधारणेचे काम करत आहेत. अध्यात्माबरोबर व्यसनमुक्त समाजासाठीही त्यांनी प्रबोधनातून मोठे योगदान दिले आहे.बंडातात्या गावोगावी जाऊन कीर्तन, प्रवचन करतात. त्यातून मिळालेले मानधन हे स्वतःसाठी खर्च न करता समाजासाठी खर्च करीत असतात. आत्तापर्यंत त्यांनी उपेक्षित देवस्थानांना मदत केली आहे. अलीकडेच त्यांनी त्र्यंबकेश्वर येथील निवृत्तीनाथ महाराज मंदिरातील विठ्ठल रुक्मिणीला सोन्याचे दागिने अर्पण करण्याचा संकल्प केला होता. त्यासाठी त्यांनी नातेपुते येथील साधक सुनील राऊत यांच्याशी चर्चा करून सोन्याचे दागिने तयार करून घेण्यास सांगितले होते. त्यानुसार राऊत यांनी सोन्याचे दागिने तयार करून घेतले.

### चिठ्ठीतून व्यक्त केली इच्छा...

बंडातात्या यांना भेटण्यासाठी पंढरपूरचे बापूसाहेब महाराज देहूकर गेले होते. त्यावेळी बंडातात्या यांनी एक चिठ्ठी लिहून निवृत्तीनाथ महाराज देवस्थानसाठी तयार केलेले सोन्याचे दागिने त्र्यंबकेश्वरला मंदिर देवस्थानाकडे सुपूर्द करा, असे सांगितले. त्यानुसार आज देहूकर यांच्याकडे सोन्याचे दागिने देण्यात आले. रुग्णालयात उपचार सुरू असतानाही कराडकर यांनी त्यांचा संकल्प पूर्ण करीत आपले वेगळेपण दाखवून दिले आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




श्रेष्ठी म्हणतील तसं!

| कल्याण |
|---|
| 460-02-110 |

| मेन बाजार |
|---|
| 788-31-489 |

सातवे पुण्यस्मरण



कै.विष्णुपंत (तात्या) गणपतराव कोठे

जन्म : १० ऑगस्ट १९३७ | मृत्यू : १७ जानेवारी २०१६

जन्म असा लाभावा, देह चंदनाचा मिळवा ।
सहवास संपला तरी, सुगंध मात्र दरवळत रहावा ।।

सातव्या पुण्यस्मरणानिमित्त
विनम्र अभिवादन...

अभिवादक

सुराज्य सोलापूर

परिवार, सोलापूर